**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**

**सभावृत्तांत**

**कार्यपत्रिका क्र. ६**

दिनांक :- २१/११/२०१२ वेळ :- १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दि. २१/११/२०१२ रोजी दु. ११.४५ वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन | अध्यक्षा |
| २. | मा. नेटके सुमन राजेंद्र | सदस्य |
| ३. | मा. तरस बाळासाहेब जयवंत | सदस्य |
| ४. | मा. भोंडवे संगिता राजेंद्र | सदस्य |
| ५. | मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव | सदस्य |
| ६. | मा. शमीम पठाण | सदस्य |
| ७. | मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव | सदस्य |
| ८ | मा. को-हाळे अनंत सुभाष | सदस्य |
| ९. | मा. शिंदे शितल उर्फ विजय गोरख | सदस्य |
| १०. | मा. साळुंके सविता सुरेश | सदस्य |
| ११. | मा. मासुळकर समीर मोरेश्वर | सदस्य |
| १२. | मा. पालांडे सुजाता सुनिल | सदस्य |
| १३. | मा. पानसरे अमिना मोहंम्मद | सदस्य |
| १४. | मा. मंचरकर गिता सुशिल | सदस्य |
| १५. | मा. साबळे छाया जगन्नाथ | सदस्य |
| १६. | मा. ओव्हाळ शेखर अशोक | सदस्य |

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रभाग अधिकारी अजीज कारचे, मा. कार्य.अभियंता मकरंद निकम, शरद जाधव, रामदास जाधव, प्रशासन अधिकारी एस.एन. राऊत. इत्यादी.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन उपस्थितांचे स्वागत केले. व सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली

सूचक - मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव अनुमोदक : मा. पालांडे सुजाता सुनिल

महाराष्ट्राचे लाडके नेते आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांचे दुखद निधन झाले असलेने त्यास श्रध्दांजली वाहून सभा सोमवार दि. २६/११/२०१२ रोजी स.११.४५ वाजेपर्यंत तहकूब करण्यात यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य करणेत आली.

(सर्वांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

मा.अध्यक्षा - सभा सोमवार दि. २६/११/२०१२ रोजी स.१२.०० वाजेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

सही/-

[ ठाकरे मंदाकिनी अर्जुन ]

अध्यक्ष

ब प्रभाग समिती, चिंचवड

प्रशासन अधिकारी

सभाशाखा, ब प्रभाग समिती

पि.चिं.मनपा, चिंचवड-३३.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**

**सभावृत्तांत**

**कार्यपत्रिका क्र. ६**

**( माहे नोहेंबर ची तहकूब सभा )**

दिनांक :- २६/११/२०१२ वेळ :- १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दि. २६/११/२०१२ रोजी दु. ११.४५ वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन | अध्यक्षा |
| २. | मा. नेटके सुमन राजेंद्र | सदस्य |
| ३. | मा. तरस बाळासाहेब जयवंत | सदस्य |
| ४. | मा. भोंडवे संगिता राजेंद्र | सदस्य |
| ५. | मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव | सदस्य |
| ६. | मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर | सदस्य |
| ७. | मा. शमीम पठाण | सदस्य |
| ८. | मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव | सदस्य |
| ९. | मा. चिंचवडेपाटील आश्विनी गजानन | सदस्य |
| १०. | मा. डोके अपर्णा निलेश | सदस्य |
| ११ | मा. को-हाळे अनंत सुभाष | सदस्य |
| १२. | मा. पालांडे सुजाता सुनिल | सदस्य |
| १३. | मा. पानसरे अमिना मोहंम्मद | सदस्य |
| १४. | मा. मंचरकर गिता सुशिल | सदस्य |
| १५. | मा. साबळे छाया जगन्नाथ | सदस्य |
| १६. | मा. चाबुकस्वार गौतम सुखदेव | सदस्य |
| १७. | मा. ओव्हाळ शेखर अशोक | सदस्य |

तसेच खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा. प्रभाग अधिकारी अजीज कारचे, मा. कार्य.अभियंता मकरंद निकम, शरद जाधव, रामदास जाधव, प्रशासन अधिकारी एस.एन. राऊत.उपअभियंता एम.एम. चव्हाण,एस.एन.वाघुंडे, एम.डी.पाटोदकर, व्ही.एन.देसले, आर.पवार, व्ही. सी. काळे एस.एस. मोरे, डॉ. गोरे, सहा.आरोग्याधिकारी एन.एम.नाईक, कार्या. अधि. अतिक्रमण बी.टी. बो-हाडे, उद्यान एस.पी. बनसोडे, इत्यादी.

सर्वप्रथम मा. अध्यक्ष मा. ठाकरे मंदाकिनी अर्जुन उपस्थितांचे स्वागत केले. व सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

मागील सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आला.

प्रशासन अधिकारी (सभाशाखा) ब प्रभाग समिती यांनी विषयपत्राचे वाचन केले. तदनंतर मा. अध्यक्षांचे परवानगीने खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेतले.

विषय क्र. २ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. ३९ संत तुकारामनगर मध्ये वल्लभनगर एस.टी. स्टँण्डसमोरील फुटपाथवर मनपाच्या स्त्रीयांसाठी व पुरुषांसाठी अशा दोन सार्वजनिक मुता-या आहेत. सदर मुता-या मोडकळीस आलेल्या असून फुटपाथवर पादचा-यांना अडचणीच्या ठरत आहेत. तरी सदरच्या दोन्ही मुता-या बाजुला विकसित होत असलेल्या मनपाच्या आरक्षण क्र. ५३ मध्ये रस्त्याच्या बाजूस नव्याने करणेत याव्यात. तरी वल्लभनगर एस.टी.स्टँण्ड समोरच्या फुटपाथवरील स्त्री व पुरुषांच्या सार्वजनिक मुता-या काढून बाजुच्या आरक्षण क्र. ५३ मध्ये रस्त्याच्या बाजुला नव्याने विकसित करणेस मान्यता देणेत यावी.

विषय क्र. ३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

नामकरणाबाबत.

- पुनावळे येथील स.नं.१२/१ या ठिकाणी बांधलेल्या पाण्याच्या टाकीस धोंडिबा उर्फ कान्होबा महादेव कामठे हे नांव देणेत यावे.
- पुनावळे येथील ओव्हाळवस्ती या ठिकाणी असणा-या श्री. शंकर ओव्हाळ यांच्या घराजवळील वस्तीला कैलास नगर असे नांमकरण करण्यात यावे.
- पुनावळे येथील शेतकरी संदिप ताजणे यांच्या घराजवळील वस्तीस ताजणे वस्ती असे नामकरण करण्यात यावे.
- पुनावळे येथील शेतकरी श्री. सचिन कोयते यांच्या घराजवळील वस्तीस कोयते वस्ती असे नांमकरण करण्यात यावे.
- पुनावळे येथील बालाजी मंदीर येथील वस्तीस पांढरे वस्ती असे नांमकरण करण्यात यावे.
- पुनावळे येथील अशोक काटे यांच्या घराजवळील वस्तीस काटे वस्ती असे नांमकरण करण्यात यावे.

विषय क्र. ४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनीमध्ये रसरंग चौक येतो तरी सदर चौकास श्री स्वामी समर्थ नगर असे नामकरण करणेत यावे.

विषय क्र. ५ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र.१८ किवळे येथे खालीलप्रमाणे नामकरण करणेत यावे.

- शुभंकर नगरी समोरील चौकास श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक असे नामकरण करण्यात यावे.
- एम.बी.कॅम्प या वसाहतीस कै. भिमराव रामभाऊ तरसनगर असे नामकरण करण्यात यावे.
- जुनी सरपंच वस्ती व परिसरास दत्तनगर असे नांव दयावे.
- दत्तनगरमधील चौकास श्री सिध्दी विनायक चौक व रस्त्यास श्री. वासुदेवानन्द सरस्वती महाराज मार्ग असे नामकरण करण्यात यावे.
- मुंबई पुणे द्रुतगती मार्ग बापदेव चौक ते प्राधिकरण या नियोजित ४५ मीटर रस्त्याचे स्व.प्रा. रामकृष्ण मोरे मार्ग असे नामकरण करण्यात यावे.
- स.नं. ६६ मध्ये नियोजित ४५ मीटर रस्ता ते किवळे हद्दीतील रेल्वे पर्यंतच्या रस्त्याचे कै. तुकाराम गेनू आमले असे नामकरण करण्यात यावे.
- याच रस्त्याचे पुर्वेकडील वस्तीस राजारामनगर असे नामकरण करण्यात यावे.
- किवळे गांवठाण ते धर्मराज मंगल कार्यालय देहुरोड कात्रज बाहयवळण रस्त्यापर्यंतच्या रस्त्यास स्व. श्री. शिवराम महादू तरस मार्ग असे नांमकरण करण्यात यावे.
- किवळे गांवठाण चौकास धर्मवीर श्री. संभाजीराजे चौक असे नांव देण्यात यावे.

- साईनगर मामुर्डीच्या दक्षिणेच्या भागांस राऊतव्दार मामुर्डी असे नांव देण्यात यावे.
- विकासनगर येथील मुनीमजी बंगल्या शेजारील वसाहतीस इंदीरा कॉलनी व त्यामागील भागांस मीना कॉलनी असे नांमकरण करावे.
- दांगटवस्ती ते गुलमोहोर अपार्टमेंट रस्त्यास स्व. श्री. मारुती श्रीपती चव्हाण असे नांव दयावे व तेथील चौकास श्री. गणपती चौक असे नांव देणेत यावे.
- स.नं. ७० पासून (सेंट जोसेप शाळा) ते भिमाशंकरनगर जाणा-या रस्त्यास स्व.श्री.बाबुराव बापू तरस असे नांमकरण करावे.

विषय क्र. ६ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

किवळे गांवठाण भागात पुर्वीची मुतारी ही काढणेत आलेली आहे त्या ठिकाणी नविन मुतारीची अत्यंत आवश्यकता आहे. तरी त्याची पुर्तता व्हावी.

विषय क्र. ७ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

- पिंपरी नगर येथील कराची स्वीट मार्ट, डिलक्स सिनेमा रोड येथील चौकास संत गाडगे महाराज चौक असे नांव देण्यात यावे.
- पिंपरी नगर येथील स्मशानभूमीस (काळेवाडी पुलाजवळील) त्रैलौक्य स्मशानभूमी असे नामकरण करण्यात यावे.

विषय क्र. ८ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. २२ मधील महापालिकेच्या वस्ताद विठोबा गावडे हॉल चिंचवड गांव विरंगुळा केंद्राजवळील मुतारी नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने घातक असून त्या ठिकाणी मुतारी लवकरात लवकर काढण्यात यावी.

विषय क्र. ९ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

चिंचवड गांवातील हेरिटेज प्लाझा ते गावडे पेट्रोलपंप या रस्त्याला कै. विठ्ठल रामा लोंढे (पथ) असे नांमकरण करावे.

सदर ठराव कायम होणेची वाट न पाहता कारवाई करावी.

विषय क्र.१० विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

चिंचवडगांवचे भुषण पै. विजय हनुमंत गावडे यांनी दिल्ली सोनीपथ येथे झालेल्या भारत केसरी स्पर्धेत यश मिळवून पिंपरी चिंचवड शहराचा नावलौकीक या भारतभर केलेला आहे. त्यांचे अभिनंदन आजचे सभेत करणेत यावे.

विषय क्र. ११ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

बिजलीनगर कै.सोपानराव भोईर विरंगुळा केंद्र येथे जेष्ठ नागरिक, सर्वांसाठी किमान १ हजार लिटरची पाण्याची टाकी करुन मिळावी.

विषय क्र. १२ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

पिंपरी चिंचवड लिंक रोड रेल्वे लाईन जवळील पत्राशेड झोपडपट्टीचे जे..एन.एन.यु आर.एम. अंतर्गत पुनर्वसन करणेत आलेले असून सदरील ठिकाणी ३ इमारतींचे काम पुर्ण झालेले असुन सदर इमारतींना तोलननगर हाडमोडे असे नामकरण करणेत यावे.

विषय क्र. १३ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

रावेत येथील बी.आर.टी.रोड तुपे वस्ती पासून ते भोंडवे वस्तीपर्यंत स.नं. २२ व २१ मधून ९.०० मीटर रस्ता घोषीत करणे.

विषय क्र. १४ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

रावेत सं.नं. १७९,१८०,१८८,१९० मधून १८ मीटर रुंदीचा नवीन रस्त घोषीत करणेबाबत.

विषय क्र. १५ विभाग : सन्मा. सदस्यांचा विषय

प्रभाग क्र. २३ केशवनगर, चिंचवड येथील म.न.पा.च्या मालकीच्या बहुउद्देशीय वस्तुंच्या नामकरणाबाबत.

ठराव क्र.४४ विषय क्र.१

दि. २६/११/२०१२ विभाग : विद्युत उद्यान

सुचक : मा. भोईर भाऊसाहेब सोपानराव अनुमोदक : मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

संदर्भ : मा. सह.शहर अभियंता (वि/यां) यांचे दि.२०/०९/२०१२ चे पत्र.

मा. सह.शहर अभियंता (वि/यां) यांनी शिफारस केलेप्रमाणे.

सन २०१३-१४ करीता मनपाच्या ब प्रभागांतर्गत असणा-या उद्यानातील विद्युत व्यवस्थचे वार्षीक देखभाल दुरुस्ती साठी र.रु.१०,००,०००/- चे (अक्षरी र.रु. दहा लाख फक्त) पुर्वगणनपत्रास व त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.४५ विषय क्र.२

दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा. पालांडे सुजाता सुनिल अनुमोदक: मा.पानसरे अमिना मोहंम्मद

संदर्भ : मा. पालांडे सुजाता सुनिल यांचे दि.२१/११/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र. ३९ संत तुकारामनगर मध्ये वल्लभनगर एस.टी. स्टँण्डसमोरील फुटपाथवर मनपाच्या स्त्रीयांसाठी व पुरुषांसाठी अशा दोन सार्वजनिक मुता-या आहेत. सदर मुता-या मोडकळीस आलेल्या असून फुटपाथवर पादचा-यांना अडचणीच्या ठरत आहेत. तरी सदरच्या दोन्ही मुता-या बाजुला विकसित होत असलेल्या मनपाच्या आरक्षण क्र. ५३ मध्ये रस्त्याच्या बाजूस नव्याने करणेत याव्यात. तरी वल्लभनगर एस.टी.स्टँण्ड समोरच्या फुटपाथवरील स्त्री व पुरुषांच्या सार्वजनिक मुता-या काढून बाजुच्या आरक्षण क्र. ५३ मध्ये रस्त्याच्या बाजुला नव्याने विकसित करणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.४६ विषय क्र.३

दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा.ओव्हाळ शेखर अशोक अनुमोदक: मा.ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव

संदर्भ : मा.ओव्हाळ शेखर अशोक यांचे दि.२१/११/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

नामकरणाबाबत.

- पुनावळे येथील स.नं.१२/१ या ठिकाणी बांधलेल्या पाण्याच्या टाकीस धोंडिबा उर्फ कान्होबा महादेव कामठे हे नांव देणेत यावे.
- पुनावळे येथील ओव्हाळवस्ती या ठिकाणी असणा-या श्री. शंकर ओव्हाळ यांच्या घराजवळील वस्तीला कैलास नगर असे नांमकरण करण्यात यावे.
- पुनावळे येथील शेतकरी संदिप ताजणे यांच्या घराजवळील वस्तीस ताजणे वस्ती असे नामकरण करण्यात यावे.
- पुनावळे येथील शेतकरी श्री. सचिन कोयते यांच्या घराजवळील वस्तीस कोयते वस्ती असे नांमकरण करण्यात यावे.
- पुनावळे येथील बालाजी मंदीर येथील वस्तीस पांढरे वस्ती असे नांमकरण करण्यात यावे.
- पुनावळे येथील अशोक काटे यांच्या घराजवळील वस्तीस काटे वस्ती असे नांमकरण करण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.४७ विषय क्र.४
दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
सुचक : मा.ठाकरे मंदाकिनी अर्जुन अनुमोदक: मा. पालांडे सुजाता सुनिल
संदर्भ : मा.ठाकरे मंदाकिनी अर्जुन यांचे दि.२१/११/२०१२ चे पत्र.
मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र. २८ मासुळकर कॉलनीमध्ये रसरंग चौक येतो तरी सदर चौकास श्री स्वामी समर्थ नगर असे नामकरण करणेस मान्यता देणेत आली.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.४८ विषय क्र.५
दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
सुचक : मा.तरस बाळासाहेब जयवंत अनुमोदक: मा. नेटके सुमन राजेंद्र
संदर्भ : मा.तरस बाळासाहेब जयवंत यांचे दि.२१/११/२०१२ चे पत्र.
मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र.१८ किवळे येथे खालीलप्रमाणे नामकरण करणेत यावे.

- शुभंकर नगरी समोरील चौकास श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक असे नांमकरण करण्यात यावे.
- एम.बी.कॅम्प या वसाहतीस कै. भिमराव रामभाऊ तरस नगर असे नामकरण करण्यात यावे.
- जुनी सरपंच वस्ती व परिसरास दत्तनगर असे नांव दयावे.
- दत्तनगरमधील चौकास श्री सिध्दी विनायक चौक व रस्त्यास श्री. वासुदेवानन्द सरस्वती महाराज मार्ग असे नामकरण करण्यात यावे.
- मुंबई पुणे द्रुतगती मार्ग बापदेव चौक ते प्राधिकरण या नियोजित ४५ मीटर रस्त्याचे स्व.प्रा. रामकृष्ण मोरे मार्ग असे नामकरण करण्यात यावे.
- स.नं. ६६ मध्ये नियोजित ४५ मीटर रस्ता ते किवळे हद्दीतील रेल्वे पर्यंतच्या रस्त्याचे कै. तुकाराम गेनू आमले असे नामकरण करण्यात यावे.
- याच रस्त्याचे पुर्वेकडील वस्तीस राजारामनगर असे नामकरण करण्यात यावे.
- किवळे गांवठाण ते धर्मराज मंगल कार्यालय देहुरोड कात्रज बाहयवळण रस्त्यापर्यंतच्या रस्त्यास स्व. श्री. शिवराम महादू तरस मार्ग असे नांमकरण करण्यात यावे.
- किवळे गांवठाण चौकास धर्मवीर श्री. संभाजीराजे चौक असे नांव देण्यात यावे.
- साईनगर मामुर्डीच्या दक्षिणेच्या भागांस राऊतनगर मामुर्डी असे नांव देण्यात यावे.
- विकासनगर येथील मुनीमजी बंगल्या शेजारील वसाहतीस इंदीरा कॉलनी व त्यामागील भागांस मीना कॉलनी असे नांमकरण करावे.
- दांगटवस्ती ते गुलमोहोर अपार्टमेंट रस्त्यास स्व. श्री. मारुती श्रीपती चव्हाण असे नांव दयावे व तेथील चौकास श्री. गणपती चौक असे नांव देणेत यावे.
- स.नं. ७० पासून (सेंट जोसेप शाळा) ते भिमाशंकरनगर जाणा-या रस्त्यास स्व.श्री.बाबुराव बापू तरस असे नांमकरण करावे.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.४९ विषय क्र.६

दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा.तरस बाळासाहेब जयवंत अनुमोदक: मा. नेटके सुमन राजेंद्र

संदर्भ : मा.तरस बाळासाहेब जयवंत यांचे दि.२१/११/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

किवळे गांवठाण भागात पुर्वीची मुतारी ही काढणेत आलेली आहे त्या ठिकाणी नविन मुतारीची अत्यंत आवश्यकता आहे. तरी त्याची पुर्तता व्हावी.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.५० विषय क्र.७

दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव अनुमोदक: मा. को-हाळे अनंत सुभाष

संदर्भ : मा.चाबुकस्वार गौतम सुखदेव यांचे दि.२१/११/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

- पिंपरी नगर येथील कराची स्वीट मार्ट, डिलक्स सिनेमा रोड येथील चौकास संत गाडगे महाराज चौक असे नांव देण्यात यावे.
- पिंपरी नगर येथील स्मशानभूमीस (काळेवाडी पुलाजवळील) त्रैलौक्य स्मशानभूमी असे नामकरण करण्यात यावे.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.५१ विषय क्र.८

दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा.ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव अनुमोदक: मा चिंचवडेपाटील अश्विनी

गजानन संदर्भ : मा.ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव यांचे दि.२१/११/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र. २२ मधील महापालिकेच्या वस्ताद विठोबा गावडे हॉल चिंचवड गांव विरंगुळा केंद्राजवळील मुतारी नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने घातक असून त्या ठिकाणाची मुतारी लवकरात लवकर काढणेस मान्यता दिली

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.५२ विषय क्र.९

दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय

सुचक : मा. को-हाळे अनंत सुभाष अनुमोदक: मा नेटके सुमन राजेंद्र

संदर्भ : मा. को-हाळे अनंत सुभाष यांचे दि.२१/११/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

चिंचवड गांवातील हेरिटेज प्लाझा ते गावडे पेट्रोलपंप या रस्त्याला कै. विठ्ठल रामा लोंढे (पथ) असे नांमकरण करावे.

सदर ठराव कायम होणेची वाट न पाहता कारवाई करावी.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.५३ विषय क्र.१०
दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
सुचक : मा.ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव अनुमोदक: मा चाबुकस्वार गौतम सुखदेव
संदर्भ : मा.ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव यांचे दि.२१/११/२०१२ चे पत्र.
मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

चिंचवडगांवचे भुषण पै. विजय हनुमंत गावडे यांनी दिल्ली सोनीपथ येथे झालेल्या भारत केसरी स्पर्धेत यश मिळवून पिंपरी चिंचवड शहराचा नावलौकीक या भारतभर केलेला आहे. त्यांचे अभिनंदनाचा ठराव मंजूर करणेत आला.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.५४ विषय क्र.११
दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
सुचक : मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर अनुमोदक: मा भोईर भाऊसाहेब सोपानराव
संदर्भ : मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर यांचे दि.२१/११/२०१२ चे पत्र.
मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

बिजलीनगर कै.सोपानराव भोईर विरंगुळा केंद्र येथे जेष्ठ नागरिक, सर्वांसाठी किमान १ हजार लिटरची पाण्याची टाकी करण्यात यावी.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.५५ विषय क्र.१२
दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
सुचक : मा.साबळे छाया जगन्नाथ अनुमोदक: मा ओव्हाळ शेखर अशोक
संदर्भ : मा.साबळे छाया जगन्नाथ यांचे दि.२१/११/२०१२ चे पत्र.
मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

पिंपरी चिंचवड लिंक रोड रेल्वे लाईन जवळील पत्राशेड झोपडपट्टीचे जे..एन.एन.यु आर.एम. अंतर्गत पुनर्वसन करणेत आलेले असून सदरील ठिकाणी ३ इमारतींचे काम पुर्ण झालेले असुन सदर इमारतींना तोलननगर हाडमोडे असे नामकरण करणेत यावे.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.५६ विषय क्र.१३
दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
सुचक : मा.भोंडवे संगिता राजेंद्र अनुमोदक: मा चिंचवडेपाटील आश्विनी गजानन
संदर्भ : : मा.भोंडवे संगिता राजेंद्र यांचे दि.२१/११/२०१२ चे पत्र.
मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मौजे रावेत येथील तुपे वस्ती व भोंडवे वस्ती या भागामध्ये मोठया प्रमाणावर रहिवासी भाग व वस्ती साधारणत्: ३० ते ४० वर्षांपुर्वी वाढलेली आहे व वाढत आहे. परंतू आजपर्यंत तुपे वस्ती पासून भोंडवे वस्तीस जाण्यास मध्ये रस्ता झालेला नाही. त्यामुळे प्रत्येक रहिवाश्यास येण्याजाण्यास व वाहतुकीस समस्या निर्माण झालेली आहे. बी.आर.टी. रोड तुपे वस्ती ते भोंडवे वस्ती हा सर्व्हे.नं.२२ मधून स.नं.२१ रस्त्यालगत जाण्या येण्यास फक्त पाऊलवाट आहे. तेथूनच पिण्याचे पाणी पाईप लाईन व ड्रेनेज लाईन झालेली आहे. व इलेक्ट्रीक पाईप व ड्रेनेज लाईन झालेली आहे. व इलेक्ट्रीक स्ट्रिट लाईन सुध्दा झालेली आहे.

तरी या वस्तीमधील इलेक्ट्रीक स्ट्रिट लाईन दुरुस्त करण्यासाठी महानगरपालिकेची गाडी जाण्यास समस्या आहे. तसेच कच-याची गाडी जाण्या येण्यासही समस्या असल्यामुळे रोज कचरा उचलणेत येत नाही. यामुळे तेथे घाणीचे साम्राज्य आहे.
तसेच तेथे लहान मुलांची आंगणवाडी सुध्दा आहे. त्या मुंलांना येण्याजाण्यास समस्या आहे. व आरोग्यास धोका आहे. तरी स.नं. २२ तुपे वस्ती ते स.नं. २१ मध्ये जाण्यास कमीत कमी ६ मीटर रुंदीचा रस्ता आवश्यक आहे

यासाठी एम.एम.सी. ॲक्टनुसार कलम २०५ अन्वये नवीन रस्ता घोषित करुन त्या अनुषंगाने भूसंपादन कार्यवाही तसेच आवश्यक ती इतर सर्व कायदेशिर कार्यवाही करणेस मान्यता देणेत आली

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.५७ विषय क्र.१४
दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
सुचक : मा.भोंडवे संगिता राजेंद्र अनुमोदक: मा चिंचवडेपाटील आश्विनी गजानन
संदर्भ : : मा.भोंडवे संगिता राजेंद्र यांचे दि.२१/११/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मौजे रावेत येथील शिंदे वस्ती या भागामध्ये मोठया प्रमाणावर रहिवासी भाग विकसित होत आहे. तेथील वाढणारी लोकसंख्या व त्यामुळे निर्माण होणा-या वाहतुकीच्या समस्या विचारात घेऊन श्रीकृष्ण मंदिरसमोरील १८.०० मीटर रुंद रस्त्यापासून ते एम.आय.डी.सी. जलशुध्दीकरण केंद्र ते रावेत पंपिंग स्टेशन या रस्त्यास जोडणारा स.नं. १७९,१८०,१८८,१९० मधून जाणा-या हायस्टेशन लाईन खालून किमान १८.०० मीटर रुंदीचा रस्ता आवश्यक आहे.

तरी यासाठी एम.एस.सी. ॲक्टनुसार कलम २०५ अन्वये नविन रस्ता घोषीत करुन त्याअनुषंगाने भूसंपादन कार्यवाही तसेच इतर आवश्यक सर्व ती कायदेशीर कार्यवाही करणेस मान्यता देणेत आली

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

ठराव क्र.५८ विषय क्र.१५
दि. २६/११/२०१२ विभाग : सन्मा.सदस्यांचा विषय
सुचक : मा.डोके अपर्णा निलेश अनुमोदक: मा सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
संदर्भ : मा.डोके अपर्णा निलेश यांचे दि.२१/११/२०१२ चे पत्र.

मा.सदस्यांनी शिफारस केलेप्रमाणे.

प्रभाग क्र. २३, केशवनगर, चिंचवड या भागातील म.न.पा. च्या मालकीच्या महासाधु मोरया गोसावी क्रिडांगणमधील प्रेक्षक गॅलरीच्या खाली अस्तित्वात असणा-या व अनेक वर्षापासून वापराविना पडून असलेल्या बंदिस्त जागेमध्ये अंदाजे ३०० ते ४०० चौ.फु. खोल्या नव्याने विकसित केलेल्या असून परिसरातील नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी व क्रिडांगणाच्या पार्श्वभूमीवर अनेक क्रिडा प्रकारांना चालना मिळण्यासाठी, विविध उपक्रम राबविण्यासाठी या खोल्यांचा वापर करण्यात येणार असून त्याची मालकी ही मनपाची राहणार आहे. या खोल्यामध्ये बालसंस्कार वर्ग, योग शिबिर, जेष्ठ नागरिकांसाठी विरंगुळा केंद्र, अपंग व्यक्तींसाठी प्रशिक्षण केंद्र यासारखे समाजोपयोगी उपक्रम मनपाच्या माध्यमातून राबविले जाणार आहेत. त्याचा परिसरातील नागरिकांना लाभ होईल याचा मला विश्वास आहे.

महासाधु मोरया गोसावी क्रिडांगणाची उभारणी करीत असताना ज्या मुळ जागा मालकांनी मनपाला सदरची जागा विना अट उपलब्ध करुन दिली त्या जागा मालकांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी तसेच दिवंगत थोर व्यक्तींचे कायमस्वरुपी स्मरण राहून त्यांच्या कार्याची माहिती भावी पिढीला होण्यासाठी या बहुउद्देशीय नव्याने विकसित केलेल्या व कायमस्वरुपी मनपाचा मालकी हक्क राखून ठेवलेला अंदाजे ४०० चौ. फु. विविध खोल्यांना त्या कुटुंबियांनी लेखी पत्र देऊन मागणी केल्याप्रमाणे त्यांच्या कुंटुंबातील दिवंगत व्यक्तींची नांवे देऊन त्या वास्तूंचे खालीलप्रमाणे नांमकरण करण्यात यावे.

| | |
|---|---|
| उपक्रम क्र. १ बाल संस्कार केंद्र | कै. शिवाजी उर्फ नाना रामभाऊ भोईर बाल संस्कार केंद्र |
| उपक्रम क्र. २ योग शिबीर केंद्र | कै. संताजी कोंडाजी गावडे योगशिबीर केंद्र |
| उपक्रम क्र. ३ विरंगुळा केंद्र | कै. दिपक सुरेशकाका गावडे विरंगुळा केंद्र |
| उपक्रम क्र. ४ अपंग प्रशिक्षण केंद्र | कै संजय ज्ञानेश्वर शिवतरे अपंग प्रशिक्षण केंद्र |

सदरचा ठराव कायम होणेची वाट न पाहता कार्यवाही करणेत यावी.

ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. अध्यक्षा ठाकरे मंदाकिनी अर्जुन यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
[ ठाकरे मंदाकिनी अर्जुन ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

प्रति,
सर्व संबंधित

प्रशासन अधिकारी
सभाशाखा, ब प्रभाग समिती
पि.चिं.मनपा, चिंचवड-३३

क्र. एएमसी/बप्र२/कावि/३३६/२०१२, दि.१०/१२/२०१२